अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# तीर्थक्षेत्राची हेळसांड हा करंटेपणाच

महाराष्ट्र ही संतांची भूमी मानली जाते. भागवत धर्माची ध्वजा फडकवित ठेवण्याचे खरे श्रेय याच मराठी मायभूमीला मिळते. इथल्या पुण्यवान मातीमध्ये अनेक श्रेष्ठ आणि तपस्वी असे संत महात्मे होऊन गेले. इथला वारकरी संप्रदाय म्हणजे जगातला जणू काही एक मोठा चमत्कार ठरतो. ज्ञानेश्वर माऊली, जगद्गुरू तुकाराम महाराज, संत नामदेव, संत चोखामेळा, जनाबाई, मुक्ताबाई अशा शेकडो संतांच्या अभंगांवर नुसती नजर जरी फिरवली तरी त्यातून केवढे मोठे तत्त्वज्ञान त्यांनी समाजासाठी दिले आहे, याची साक्ष पटते. हे संत ज्या ज्या ठिकाणी राहिले ती सगळी गावे आज तीर्थक्षेत्रे म्हणून आज आपल्याला माहीत आहेत. याशिवाय महाराष्ट्राचे भाग्य असे की, इथे असलेली आणि महाराष्ट्राचे आराध्य दैवत मानल्या जाणाऱ्या गणपतीची आठ ठिकाणे अष्टविनायक म्हणून गौरविली गेली. आणखी एक भक्तीचा किंवा आध्यात्मिक पुण्याईचा दुसरा भाग म्हणजे देशातल्या एकूण १२ ज्योतिर्लिंगांपैकी ४ ज्योतिर्लिंगे महाराष्ट्रात आहेत. ज्यांना आपण शक्तीपिठे म्हणतो अशी देवींची साडेतीन शक्तीपिठे याच महाराष्ट्रात आहेत. पंढरपूर आळंदी, देहू, नाशिक, त्र्यंबकेश्वर या बरोबरीने अगदी शनीशिंगणापूर पासून ते खंडोबा, ज्योतिबापर्यंत अशी शेकडो देवस्थाने या महाराष्ट्राला लाभली आहेत. गोदावरी, कृष्णा, भीमा, पंचगंगा, तापी यासारख्या अक्षरश: निसर्गाची कृपा असलेल्या किंवा दैवी देणग्या असलेल्या नद्या महाराष्ट्राच्या भाग्यरेषाच ठरल्या आहेत. आजच्या आधुनिक वातावरणात कोणाचा देवावर किंवा पोथ्यापुराणांवर विश्वास असो किंवा नसो परंतु, ही सगळी तीर्थक्षेत्रे महाराष्ट्राला स्वत:ची एक वेगळी ओळख देणारी ठरतात यात काहीच वाद नाही. या दैवी देणगीचा किंवा निसर्गकृपेचा आपण किती सन्मान ठेवतो हा आजचा खरा प्रश्न आहे.

### नद्या म्हणजे भाग्यरेषा

गेल्या काही दिवसांपासून नाशिकच्या गोदावरी नदीच्या स्वच्छतेविषयी जोरदार चर्चा सुरू आहे. पुढच्या वर्षी नाशिकला कुंभमेळा होईल त्यावेळी गोदावरीचे पात्र स्वच्छ आणि निर्मळ असावे असा प्रयत्न केला जात आहे. नाशिकमधल्या अनेक संघटनांनी पुढे येऊन गोदावरीच्या स्वच्छतेची मोहीम हाती घेतली आहे. सरकारी पातळीवरून किंवा नाशिक महानगरपालिकेकडून गोदावरीचे हे पात्र स्वच्छ ठेवण्याबाबत कोणतीच ठोस योजना राबविली जात नाही. नाशिक जवळचे त्र्यंबकेश्वर हे ज्योतिर्लिंग असल्यामुळे आणि गोदावरीतले स्नान अनेकांसाठी मोठी पर्वणी मानली जाते. दुर्दैवाने आज गोदावरीचे पात्र स्वच्छ नाही. एका तीर्थक्षेत्रातील नदी स्वच्छ ठेवण्याबाबत सरकारी पातळीवरून अक्षम्य दुर्लक्ष केले जात आहे. परंतु ही कहाणी एकट्या गोदावरीची नाही तर महाराष्ट्रातल्या कृष्णा, भीमा, चंद्रभागा, इंद्रायणी या नद्यांची देखील आहे. पंढरपूरला येणाऱ्या लाखो वारकऱ्यांना चंद्रभागेमध्ये स्वच्छ पाणी सरकार देऊ शकत नाही किंवा देहू आळंदीला येणाऱ्या श्रध्दाळूंना इंद्रायणीचे स्वच्छ पाणी मिळू शकत नाही. जवळपास सगळ्या तीर्थक्षेत्री असलेल्या नद्यांची हीच दुर्दशा आहे. महाराष्ट्रासारख्या संतभूमीला पवित्र नद्यांचे वरदान लाभले असताना सरकारला त्याचे महत्त्व वाटू नये, ही एका अर्थी सांस्कृतिक शोकांतिकाच म्हणायला हवी. खरे तर यासाठी सरकारने विशेष प्रयत्न करायला हवेत. प्रामुख्याने जेवढी काही तीर्थक्षेत्रे आहेत ती स्वच्छ ठेवण्याकरिता स्वतंत्र यंत्रणा केली पाहिजे. देश परदेशातून अनेक यात्रेकरू किंवा पर्यटक महाराष्ट्रातल्या तीर्थक्षेत्रांना भेटी देत असतात. तिथली ही अस्वच्छता किंवा दुरवस्था भारताच्या भक्ती परंपरेला नावे ठेवण्यापेक्षा सरकारी अनास्थेचा पंचनामा करणारी असते, हे आमच्या राज्यकर्त्यांनी लक्षात घ्यायला हवे.

### तीर्थ विठ्ठल! क्षेत्र विठ्ठल

या सांस्कृतिक संचिताचे जतन करण्यासाठी तशीच भगवत्कृपाही असावी लागते. तरच या वैभवाचे जतन करण्याची बुध्दी राजकर्त्यांमध्ये निर्माण होऊ शकते. आमचे राज्यकर्ते केवळ सत्तेसाठी हपापले आहेत. महाराष्ट्रातल्या कोट्यवधी जनतेच्या भावना ज्या तीर्थक्षेत्रांशी जोडल्या गेल्या आहेत. ज्यांची कुलदैवते महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये विराजमान आहेत, ती सगळी ठिकाणे या भक्तांसाठी श्रध्दाकेंद्रेच ठरतात. कोणतेही तीर्थक्षेत्र किंवा मंदिर हे समाजाची भावनिक गरज असते. समाजातल्या चांगल्या संस्कारांचे आवर्तन या श्रध्दा केंद्रातून होत असते. मग अगदी मांढरदेवीची यात्रा असो, जेजुरीला भरणारी खंडोबाची यात्रा असो आंगणेवाडीची दरवर्षी भरणारी यात्रा असो अशी शेकडो ठिकाणे आहेत की जिथे यात्रांच्या निमित्ताने कोट्यवधी भक्त येत आणि जात असतात. यानिमित्ताने तिथे होणारी सांस्कृतिक आणि सामाजिक देवाणघेवाण मोठे अभिसरण घडविते. यात्रांच्या निमित्ताने पर्यटनाचा व्यवसाय किंवा रोजगारांच्या मोठ्या संधी उपलब्ध होतात. त्याचे अनुषंगिक फायदे सरकारला होत असतात त्याचा देखील विचार झाला पाहिजे. उलट या सगळ्या तीर्थक्षेत्री अत्याधुनिक किंवा सर्वप्रकारच्या सोयीसुविधा ठेवल्या गेल्या. स्वच्छता आणि स्वच्छ पाणी याचे महत्त्व राखले गेले तर सरकारने स्वत:ची सभ्यता टिकवली असे म्हणता येईल. किमान लोकांच्या श्रध्दा आणि भावना ज्या स्थानांशी निगडीत आहेत त्या ठिकाणांना प्राधान्य देण्याची सद्बुद्धी सरकारला झाली पाहिजे. केवळ कुंभमेळा आहे किंवा आषाढी एकादशीची यात्रा आहे म्हणून तात्पुरत्या सोयीसुविधा करून चालणार नाही. ज्या ठिकाणी केल्यावर मनाची प्रसन्नता अबाधित राहील असे सौजन्य प्रकट झाले पाहिजे. तुकाराम महाराजांनी तीर्थक्षेत्रांचे हे महत्त्व लक्षात घेऊनच त्याला 'तीर्थ विठ्ठल, क्षेत्र विठ्ठल' अशा शब्दांत गौरविले होते. महाराष्ट्राला मिळालेल्या या सांस्कृतिक भाग्याचे जतन करण्याचे व्रत सरकारने स्वीकारले पाहिजे. महाराष्ट्राच्या मातीमध्ये आज जी काही सौजन्याची सद्भावनेची किंवा सामाजिक सलोख्याची संस्कृती दिसून येते, त्याचे बरेचसे श्रेय मराठी भूमीतल्या तीर्थक्षेत्रांकडे जाते. नित्यनियमाने तिथे होणारे उत्सव आणि यात्रा कितीतरी मोठे सामाजिक अभिसरण घडवून आणत असतात आणि सामाजिक श्रध्दा दृढमूल करीत असतात. एवढे तरी भान आपण जपणार आहोत की नाही, एवढाच आमचा प्रश्न आहे.